जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव.

दिनांक: २५/०६/२०२५.

****

जाहीर निविदा

जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव या न्यायालयाचे अखत्यारीत असलेल्या तालुका न्यायालयांमधे झेरॉक्स मशिन खरेदी करावयाच्या आहेत. तमाम झेरॉक्स मशीन पुरविणा—या पुरवठाकार संस्थांना या जाहीर निविदेद्वारे कळविण्यांत येते की, ज्या पुरवठाकारांना यांत स्वारस्य असेल त्यांनी त्यांची दरपत्रके बंद लिफाफ्यात मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,जळगांव या नावाने पाकिटावर "झेरॉक्स मशीन पुरविण्याबाबत" असे स्पष्ट शब्दांत नमुद करुन पाकीटे प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव कक्ष क्रमांक १०१ मध्ये दिनांक: ०७/०७/२०२५ पर्यत कार्यालयीन वेळेत व कार्यालयीन दिवशी सादर करावीत अथवा समक्ष आणून दयावीत. त्यानंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही. प्राप्त झालेली दरपत्रक दिनांक: ०८/०७/२०२५ रोजी सकाळीं १०.३० वाजता मा.जिल्हा व सत्र न्यायाधीश १, जळगांव यांचे निजी कक्षात त्यांचे परवानगीने उघडले जातील.

कार्यालयीन उपयोगाकरीता लागणारे खालील वर्णनाचे झेरॉक्स मशीन उधारीवर खरेदी करावयाचे आहेत.

अ.क्र.	झेरॉक्स मशिन कॅपेसिटी	खरेदी संख्या
१	२२ सीपीएम	०८

सर्वसाधारण अटी.

१. दरपत्रकात झेरॉक्स मशीन पुरविणेबाबतचे दर वस्तु व सेवा करासहीत अंकात व अक्षरी मध्ये स्पष्टपणे नमुद करावे. महाराष्ट्र शासनाचे कार्यालयास पुरवठा केल्यास तरतुदीप्रमाणे सुट दिली जाते त्या अटीस आधीन राहून दरपत्रक दयावे लागेल तसेच बिलाची रक्कम अदा करतांना नियमानुसार टी.डी.एस. कपात करण्यात येईल.

२. दरपत्रक उघडण्याच्या दिवशी व नमुद वेळी दरपत्रक पाठविणा—यांनी प्रत्यक्ष हजर रहावे अथवा प्रतिनिधी पाठवावा अन्यथा त्यांच्या गैरहजेरीत दरपत्रक उघडणेत येतील.

३. दरपत्रक स्विकृत केल्यावर पुरवठा आदेश दिल्यानंतर सदर झेरॉक्स मशीन त्वरीत पुरविण्यात यावे. पुरविण्यात येणारे झेरॉक्स मशीन उत्कृष्ट आणि उच्च प्रतीच्या Genuine (Original) दर्जाचे असावे. मशीनचा दर्जा उत्कृष्ट आणि उच्च प्रतीचा नसल्यास मशीन या कार्यालयाकडुन स्विकारले जाणार नाही व त्याबाबत कोणतेही स्पष्टिकरण स्विकार्य राहणार नाही.

४. सदरहु झेरॉक्स मशिन या कार्यालयाने सुचविलेल्या दिनांक व कार्यालयीन वेळेतच कळविलेल्या तालुका न्यायालयात स्वखर्चाने पोहोच करून दयावे लागेल.

२...

५. सदरील झेरॉक्स मशिन जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव या कार्यालयाने कळविलेल्या तालुका न्यायालयात पोहोचवून दिल्यानंतर उधारीचे देयक तीन प्रतीत सादर करावे.

६. उपरोक्त झेरॉक्स मशिन अनुदानाचे अभावी कमी जास्त प्रमाणात खरेदी करण्याचे अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश जळगांव यांनी राखून ठेवलेले आहेत. उपरोक्त वस्तु उधारीवर खरेदी करावयाचे असल्याने सदर बिलाची रक्कम अनुदान उपलब्धतेनुसार देण्यांत येईल.

७. दरपत्रकातील दर दिनांक: ३१/१२/२०२५ अखेर कार्यरत राहतील. अगर त्यानंतरही त्याच दरात पुरविली जातील त्या कालावधीचा खुलासा स्पष्ट करावा.

८. दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारणेचा अधिकार तसेच नमुद वस्तूंचा पुरवठा आदेश देवूनही मुदतीत न केल्यास पुरवठा आदेश रद्द करण्याचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,जळगांव यांनी राखून ठेवला आहे.

V.S Kankar
प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
जळगांव.

म.जा.क./3310 /२०२५
जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव
दिनांक २५/०६/२०२५.

<u>प्रत माहिती करीता व नोटीस बोर्डावर प्रसिध्दी करीता.</u>

१. म.जिल्हाधिकारी,जळगांव.
२. म.तहसिलदार,जळगांव.
३. म.दिवाणी न्यायाधिश व.स्तर,जळगांव.
४. जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव.
५. मुख्य न्यायदंडाधिकारी,जळगांव.
६. जिल्हा व सत्र न्यायालयाच्या संकेतस्थळावर.